दैनिक

MAHILA SANVAD

# महिला संवाद

आवृत्ती : पुणे PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224 इतर आवृत्ती : मुंबई - जालना- छत्रपती संभाजीनगर - सोलापूर - सातारा

संपादक : ज्योती मधुकर आडेकर | कार्यकारी संपादक : विद्या जाधव | उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड

**महिला प्रतिनिधी पाहिजेत**

जालना आणि पुणे येथून प्रकाशित होणारे महिला संवाद या मराठी वृत्तपत्रासाठी जिल्हा, तालुका आणि सर्कलसाठी महिला प्रतिनिधी पाहिजेत.

सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय आणि भौगोलिक माहिती असणाऱ्यांनी खालील पत्तयावर संपर्क साधावा.

**महिला संवाद**

कार्यालय
दैनिक महिला संवाद,
गांधी चमन, सावित्रीबाई फुले चौक, जालना. 9168567111

PUNE : Volume No. 1, Issue No. 262, Marathi Daily Monday, Date - 13 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4

पुणे अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २६२ वा | मराठी दैनिक | सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४

**पाहिजेत**

महाराष्ट्रातील निर्भिड आणि निष्पक्ष दैनिक महिला संवाद या वृत्तपत्रासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात प्रतिनिधी पाहिजेत इच्छुकांनी खालील प्रत्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.

अनंत पार्क काळेवाडी रोड राहटणी धनगर बाबा मंदिरा जवळ पुणे शहर पुणे-४३१००३

संपर्क - 9168567111

वरील क्रमांकावर बायोडाटा पाठवावा

# तरुणीवर ॲसिड हल्ला, आरोपी फरार

## अज्ञात इसमाकडून पेट्रोल पंपाजवळ हल्ला; तरुणीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसतानाच पंढरपूर शहरात पुन्हा एक धक्कादायक ॲसिड हल्ल्याची घटना घडली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी तालुक्यातील ॲसिड हल्ला प्रकरण अद्याप ताजे असताना, त्यातील आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. अशा पार्श्वभूमीवर पंढरपूरमधील ही नवी घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.




मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वैष्णवी भागवत या तरुणीवर अज्ञात इसमाने ॲसिडसदृश पदार्थ फेकून हल्ला केला. ही घटना पंढरपूर शहरातील पेट्रोल पंप परिसरात घडली असल्याचे सांगितले जात आहे. हल्ल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. गंभीर जखमी झालेल्या वैष्णवी हिला तातडीने पंढरपूर येथील लाईफलाईन रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरांकडून उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे, या घटनेच्या दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पंढरपूर दौरा सुरू असताना शहरातच अशी गंभीर घटना घडल्याने प्रशासनावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून नागरिकांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

दरम्यान, या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध शोधमोहीम सुरू केली असून घटनास्थळाजवळील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. आरोपीचा माग काढण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असून लवकरच आरोपीला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या घटनेनंतर पीडित मुलीचे नातेवाईक मोठ्या संख्येने रुग्णालयात दाखल झाले आहेत. घटनेबाबत माहिती देताना पीडितेच्या आईने सांगितले की, आम्हाला फोनवरून माहिती मिळाल्यानंतर आम्ही तातडीने घटनास्थळी पोहोचलो. तेथे माझ्या मुलीवर ॲसिडसारखा पदार्थ टाकल्याचे समजले. कोणाच्याही मुलीवर असा अमानुष प्रकार होऊ नये, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले. या घटनेमुळे पंढरपूर शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नागरिकांनी आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## थोडक्यात...

### सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने कर्जत-जामखेडमध्ये डिजिटल शैक्षणिक क्रांती

**मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास आणि त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार हे उद्दिष्ट्य डोळ्यासमोर ठेऊन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या स्थानिक विकासनिधीतून कर्जत आणि जामखेड तालुक्यातील जिल्हापरिषद शाळांमध्ये डिजिटल शिक्षण सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. सोमवार दि. १३ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता या अभियानाअंतर्गत १४० शाळांमध्ये ६५ इंची इंटरॲक्टिव्ह पॅनल, ई-लर्निंग सॉफ्टवेअर, वायरलेस की-बोर्ड व माऊस आणि ऑफलाइन यूपीएस असे शैक्षणिक साहित्य लोकार्पणाचा सोहळा होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृश्यप्रणालीद्वारे यावेळी उपस्थित राहणार आहेत. एकूण ९ कोटी ६४ लाख २७ हजार रुपये इतक्या निधीचे डिजिटल शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. कर्जत तालुक्यात एकूण शाळांची संख्या २६६ असून सन २०२२-२३ मध्ये ४१, सन २०२४-२०२५ मध्ये १०० आणि सन २०२५-२०२६ मध्ये ८४ अशा एकूण २२५ शाळा तर जामखेड तालुक्यात एकूण शाळांची संख्या १७३ असून तेथे सन २०२२-२३ मध्ये ३०, सन २०२४-२०२५ मध्ये २८ आणि सन २०२५-२०२६ मध्ये ५६ अशा एकूण ११४ शाळांमध्ये आणि अहिल्यानगरमध्ये ०४ याप्रमाणे एकूण ३४३ शाळांमध्ये डिजिटल शैक्षणिक संच वाटप करण्यात येत आहे.

या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी तसेच शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थीवर्ग, पालक, शालेय व्यवस्थापन समिती पदाधिकारी व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. या अभियानामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण असून दृक-श्राव्य माध्यमातून अत्याधुनिक, रंजक व सुलभ शिक्षण पद्धती उपलब्ध होत आहे. शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यात वाढ होईल आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक सहभाग, आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागेल. आधुनिक शिक्षणाच्या संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही प्राप्त होत असल्याने ग्रामीण आणि शहरी अशी दरी कमी होऊन स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त होईल. या सोहळ्यात शैक्षणिक संच प्राप्त झालेल्या १४० शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक सहभागी होणार आहेत.

## डंपर चालकाने दुचाकीस्वारासह एकाला चिरडलं, दोघांचा जागीच मृत्यू

**मुंबई । प्रतिनिधी**

पूर्वद्रुतगती मार्गावर एका डंपर चालकाने दुचाकी स्वरासह एकाला चिरडल्याची घटना घडलीआहे. यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला आहे. रामनारायण संताप्रसाद यादव (५१) आणि भीमाशंकर गोपाल यादव (३५ अशी मृतांची नावे आहेत. मृत झालेले दोघे मामा भाचे होते. ते साकीनाक्याचे रहिवासी असून कल्याणला घर पाहण्यास गेले होते. तिकडून परतत असताना विक्रोळी जवळ त्यांचा हा अपघात झाला. पूर्वद्रुतगती मार्गावर आज धक्कादायक घटना घडली आहे.

## ईकेवायसी च्या नावाखाली खोट्या आमिषांना बळी पडू नका - मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ईकेवायसी (एघधउ) करून देण्याच्या नावाखाली महिलांची फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले असून, महिलांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नव्याने नोंदणी प्रक्रिया बंद करण्यात आलेली आहे. मात्र, ईकेवायसी (एघधउ) करताना काही त्रुटी राहिल्यास त्या दुरुस्त करण्यासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या प्रक्रियेसाठी कोणत्याही मध्यस्थाची आवश्यकता नसून, महिला मोबाईलवरून स्वतः ईकेवायसी (एघधउ) करू शकतात किंवा जवळील अंगणवाडी सेविकांची मदत घेऊ



शकतात, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जळगाव कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार, ईकेवायसी (एघधउ) च्या बहाण्याने लाभार्थी महिलांकडून गैरवर्तन केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित प्रकरणात गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. त्यानुसार दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

ईकेवायसी (एघधउ) करून देतो असे सांगून काहीजण महिलांची दिशाभूल करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महिलांनी कोणत्याही आमिषाला बळी पडू नये तसेच खोट्या भूलथापांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

## भाजप नगरसेविकेच्या पतीवर भररस्त्यात हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

नगरपालिका निवडणुकीतील पराभवाचा राग आणि राजकीय वादातून एक भयानक घटना घडल्याचे समोर आले आहे. बीडमध्ये एका भाजप नगरसेविकेच्या पतीला भररस्त्यात बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मारहाणीचा सीसीटीव्ही व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. हा व्हिडीओ पाहून शहरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आता नेमकं काय घडलं जाणून घ्या



बीड नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपच्या तिकीटावर भाग्यश्री देशपांडे या नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांचे पती सागर देशपांडे हे शहरातील एका रस्त्यावर उभे राहून फोनवर बोलत असताना पाच जण त्यांच्याकडे आले. या पाच जणांनी सागर देशपांडे यांच्याशी वाद घालत त्यांना घेरले आणि लगेचच लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण सुरू केली. निवडणुकीतील जुन्या राजकीय वादाचा मुद्दा पुढे करून हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.


भररस्त्यात सुरू असलेल्या या मारहाणीमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेर्यात कैद झाली असून, हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.

या प्रकरणी पीडित सागर देशपांडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार बीड शहर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या पाचही संशयितांविरुद्ध मारहाण, धमकी आणि सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालण्याचे गुन्हे नोंदवले आहेत. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, हल्ला नगरपालिका निवडणुकीतील पराभव जिव्हारी लागल्यामुळे करण्यात आला असावा, अशी चर्चा शहरात सुरू आहे. मात्र, हल्ल्यामागे नेमके कोण सूत्रधार आहेत आणि यामागे आणखी काही राजकीय षड्यंत्र आहे का? याचा सखोल तपास पोलीस करत आहेत.

## इगतपुरीत वैतरणा धरणात दोन तरुण बुडाले; मित्राला वाचवताना दुर्दैवी घटना

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीत धक्कादायक घटना घडली आहे. वैतरणा धरणातनाशिकयेथील दोन तरुण बुडाल्याची घटना घडली आहे.



वैतरणा धरणालगत असलेल्या धबधब्याखाली चार मित्र पाण्यात उतरले होते. मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला. मात्र, त्याला वाचवण्याचा प्रयत्नात दुसराही बुडाल्याची घटना घडली आहे. स्थानिकांच्या मदतीने दोघांचा शोधकार्य सुरु करण्यात आले आहे.

मागील वर्षी याच ठिकाणी अशाच प्रकारची घटना घडली होती. मात्र, पुन्हा एकदा धरण परिसरात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, वैतरणा धरणात युवक बुडाल्याची घटना घडल्यामुळं परिसरात खळबळ उडाली आहे. पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला होता. त्याला वाचवण्यासाठी गेलेला दुसरा युवक देखील पाण्यात वाहून गेला आहे. या दोघांचे शोधकार्. सुरु करण्यात आले आहे.

## प्रशासकीय अनुभवांचे समृद्ध संचित साहित्यातून मांडणे काळाची गरज -विजया रहाटकर

**दिल्ली । वृत्तसेवा**

प्रशासकीय सेवेतील अफाट आणि वैविध्यपूर्ण अनुभवांचे संचित केवळ स्वतःपुरते मर्यादित न ठेवता, ते साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर येणे ही काळाची गरज आहे. प्रशासनातील संवेदनशीलता जपण्यासाठी आणि कामाचा ताण हलका करण्यासाठी साहित्य हे एक उत्तम माध्यम आहे,असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदन येथे मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली आणि 'सरहद' संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय ऐतिहासिक साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर संमेलनाध्यक्षा तथा निवृत्त अतिरिक्त मुख्य सचिव लीना मेहंदळे , स्वागताध्यक्षा तथा सहमहालेखा नियंत्रक सुप्रिया देवस्थळी , संमेलनाच्या निमंत्रक तथा महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला,विशेष आयुक्त श्वेता सिंघल, मुख्य संयोजक सुषमा संजय नहार कार्यवाह श्रीमती पगारिया आणि सहसंयोजक लेशपाल जवळगे उपस्थित होते.

यावेळी विजया रहाटकर यांनी महिला अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि त्यांच्यातील दडलेल्या साहित्यिक प्रतिभेचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या की, राजमाता जिजाऊ आणि महाराणी ताराराणी यांनी राज्यकारभाराचा जो आदर्श आणि धोरणीपणा दाखवला, त्याचाच वारसा आजच्या महिला अधिकारी समर्थपणे पुढे नेत आहेत. रोजच्या धावपळीच्या दिनचर्येत अधिकाऱ्यांना अनेक सामाजिक आणि आर्थिक संघर्षांना सामोरे जावे लागते. हे अनुभव जेव्हा कथा किंवा कवितेच्या रूपात कागदावर उतरतात, तेव्हा ते केवळ लेखन न राहता देशाच्या बदलाचे महत्त्वाचे दस्तऐवज ठरतात. आज आपण तंत्रज्ञान आणि आयटीच्या युगात वावरत असताना मानवी संवेदनांची साहित्याशी जोड असणे अधिक गरजेचे झाले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील प्रश्नांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आपल्या लेखणीचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी बहिणाबाई चौधरी आणि आचार्य अत्रे यांच्या साहित्याचा संदर्भ देत मराठी भाषेची थोरवी विषद केली.

संमेलनाच्या स्वागताध्यक्षा सुप्रिया देवस्थळी यांनी आपल्या मनोगतातून प्रशासकीय सेवेतील महिलांच्या प्रवासाचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, महिला अधिकाऱ्यांनी केवळ सरकारी कामकाजाच्या फाईलींपुरते मर्यादित न राहता आपल्या अनुभवांतून समाजाचे वास्तव मांडले पाहिजे. संमेलनातील सत्रांचा उल्लेख करताना त्यांनी परराष्ट्र सेवेतील प्रतिभा बारकर आणि




मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांच्या प्रशासकीय आणि साहित्यिक योगदानाचे कौतुक केले. सेवेतील सुरुवातीच्या काळात महिला अधिकाऱ्यांना करावा लागलेला संघर्ष आणि त्यानंतर त्यांनी सिद्ध केलेले आपले कर्तृत्व हा प्रशासकीय इतिहासाचा महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी नमूद केले.

संमेलनाध्यक्षा लीना मेहंदळे यांनी अधिकाऱ्यांना प्रोत्साहित करताना सांगितले की, प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना आपण चोवीस तास 'कॉल ऑन ड्युटी' असतो, मात्र या धावपळीत स्वतःमधील सर्जनशील माणूस जिवंत ठेवणे आवश्यक आहे. अधिकाऱ्यांनी संकोच सोडून लेखक आणि संवेदनशील नागरिक म्हणून व्यक्त व्हावे. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सेल्फ सर्टिफिकेशन' धोरणाचे स्वागत करत प्रशासनातील आधुनिक बदलांचा आणि तंत्रज्ञानाचा, विशेषतः 'युनिकोड'चा प्रभावी वापर करण्याचे आवाहन उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

संमेलनाच्या निमंत्रक व महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी प्रशासकीय कर्तव्य आणि साहित्याची सेवा यांच्या संगमावर भाष्य केले. त्या म्हणाल्या की, जेव्हा प्रशासकीय अनुभवाची जोड संवेदनशील लेखणीला मिळते, तेव्हा समाजाकडे पाहण्याचा एक अधिक मानवी आणि न्यायपूर्ण दृष्टिकोन विकसित होतो. संत तुकारामांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, महिला अधिकाऱ्यांनी आपल्या साहित्यातून समाजाला समृद्ध करण्याचे काम केले आहे. लेखणी कधीही थांबत नाही, ती सतत प्रवाहित राहते,असा प्रेरणादायी संदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी साहित्य संमेलन संयोजन आणि समन्वयासाठी सहकार्य करणारे अधिकारी कर्मचारी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरजा आपटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहसंयोजक लेशपाल जवळगे यांनी केले. या दोन दिवसीय साहित्य संमेलनामुळे प्रशासकीय जबाबदारी आणि सृजनशीलता यांचा एक उत्तम संगम पाहायला मिळाला. या समारोप सोहळ्याला देशाच्या विविध भागांतून आलेल्या ज्येष्ठ महिला प्रशासकीय अधिकारी, साहित्यिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...


### महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

पंढरपूरातील ॲसिड हल्ल्याची घटना केवळ एक गुन्हा नाही, तर आपल्या समाजातील वाढत्या असुरक्षिततेचा आणि व्यवस्थेतील त्रुटींचा तीव्र इशारा आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटना सातत्याने समोर येत असताना, प्रशासन आणि समाज या दोघांनीही याकडे केवळ बातमी म्हणून न पाहता गंभीर चिंतेचा विषय म्हणून पाहण्याची गरज आहे. अहिल्यानगरमधील ॲसिड हल्ला प्रकरण अद्याप निकाली निघालेले नाही, आरोपी मोकाट फिरत आहे, आणि त्याच पार्श्वभूमीवर पंढरपूरात पुन्हा अशीच घटना घडते, हे अत्यंत चिंताजनक आहे. याचा अर्थ केवळ गुन्हेगारांचा धाडस वाढत आहे असे नाही, तर कायद्याचा धाक कमी होत चालल्याची भावना समाजात निर्माण होत आहे. गुन्हेगारांना शिक्षा होण्यात होणारा विलंब किंवा तपासातील ढिलाई हीच अशा घटनांना अप्रत्यक्षपणे खतपाणी घालत आहे. या घटनेत आणखी एक गंभीर बाब म्हणजे ही घटना घडत असताना राज्याचे उपमुख्यमंत्री शहरात उपस्थित होते. यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या यंत्रणेबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. मोठ्या दौऱ्यांच्या वेळी सुरक्षा यंत्रणा अधिक सजग असते, तरीही अशा प्रकारचा गुन्हा घडतो, याचा अर्थ स्थानिक पातळीवर सुरक्षेची साखळी कमकुवत आहे का, हा प्रश्न विचारावा लागतो. ॲसिड हल्ला हा केवळ शारीरिक जखम करणारा गुन्हा नाही, तर तो पीडितेच्या आयुष्यावर कायमस्वरूपी मानसिक, सामाजिक आणि आर्थिक परिणाम करणारा असतो. अशा गुन्ह्यांना रोखण्यासाठी केवळ पोलिसी कारवाई पुरेशी नाही, तर समाजाची मानसिकता बदलणेही तितकेच आवश्यक आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले महान समाजसुधारक

महात्मा फुले हे महान समाजसुधारक होते.त्याच्याच प्रयत्नातून आपल्याला आज समाजात एकता व बंधुता दिसून येते. महात्मा जोतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ ला सातारा जिल्ह्यातील  कटगुण या गावी झाला.जन्मताच समाज सुधारणेची तळमळ त्यांच्यामध्ये होती.त्यामुळे आज संपूर्ण भारतात महात्मा फुले यांना समाजसुधारक म्हणून मोठ्या आदरतीत्थाने ओळखले जाते.महात्मा फुले कर्तृत्ववान महापुरुष होते.त्यामुळेच त्यांच्यात आपल्याला समाज सुधारणेचे संपूर्ण गुण पहायला मिळतात.

महात्मा फुले  सामाजिक प्रबोधनकार, भारतीय सामाजिक कार्यकर्ते,महान विचारवंत, समाजसुधारक, उत्कृष्ट लेखन, स्त्रियांना व समाजातील लोकांना शिक्षीत करने,जातीय व्यवस्थेचे निर्मुलन इत्यादी अनेक महान कार्याने आज महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या सन्मानाने महात्मा फुलेंना ओळखले जाते. त्यामुळेच आज संपूर्ण भारत त्यांच्या कार्यापुढे नतमस्तक होतो.महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रत्येक कार्यात त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना फुले त्यांच्या सोबत रहात असत.त्यामुळे सामाजिक कार्यात त्यांचा सुध्दा तेवढाच महत्त्वाचा वाटा दिसून येतो.सावात्रीबाई फुले भारतातील पहील्या महीला शिक्षणाच्या जनक होत्या.आज महाराष्ट्रात शिक्षणामध्ये जी काही सुधारणा, क्रांती,आमुलाग्र बदल व विविधता दिसून येते त्यांचे संपूर्ण श्रेय महात्मा ज्योतिबा फुलेंना व सावित्रीबाई फुलेंना जाते.महात्मा जोतिबा फुले यांचे एवढे महाग कार्य आहे की महाराष्ट्रासह संपूर्ण भारत कधीच विसरणार नाही.



कारण सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला.शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली. ती पहीली शिवजयंती होती. त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.

म्हणजेच  महात्मा  जोतिबा  फुले समाजसुधारक तर होतेच परंतु शिवरायांच्या समाधीचा शोध लावुन इतिहास जागृत केला. त्यामुळे त्यांच्यात आपल्याला दैवी शक्तीचे रूपही पहायला मिळते.अशा क्रांतिकारक महान समाजसुधारक ज्योतिबा फुलेंना कोटी कोटी प्रणाम. महात्मा  ज्योतिबा फुलेंनी समाज सुधारण्यासाठी दिशा दिली व समाजामध्ये सुधारणा झाल्याचे आपण पहातो. त्याचप्रमाणे आज त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आज निसर्गाला वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.कारण महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची सुरुवात वृक्षांच्या छायेत केली.त्यामुळेच वृक्षांचा व शिक्षणाचा मोकळा स्वाद घेऊ शकलो. महात्मा  फुलेंच्या जयंती निमित्त महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.

कारण आज बदलते हवामान, युद्धजन्य परिस्थिती, औद्योगिकरण आणि समाजाची अत्याधुनिक युगाकडे वाटचाल यामुळे  दिवसेंदिवस निसर्गाचा ह्रास होवून प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्याला वाचविण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.त्यामुळे जयंती निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे अत्यंत गरजेचे आहे.यातच आपल्याला  महात्मा  ज्योतिबा फुले यांचे आचार-विचार अवश्य दिसून येईल व प्रत्येक झाडाच्या पानात, फळात, फुलात  महात्मा फुलेंचे दर्शन अवश्य होईल.जय हिंद.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

## स्वदेशी सल्लागार कंपन्यांचे साह्य घेणारा कौशल्य विकास विभाग राज्यात प्रथम

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनात भारतीय सल्लागार कंपन्यांना नेमण्याचे धोरण आखले असून यासंदर्भात शासन निर्णय जारी झाला आहे. या निर्णयाची  राज्यात कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाद्वारे सर्वात आधी अंमलबजावणी होत आहे.

यासंदर्भात मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी देशी सल्लागार कंपनीच्या सेवा उपलब्ध करून घेण्याबाबत कौशल्य विकास विभागाला पत्र ही लिहिले आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वदेशीचा पुरस्कार करण्याचा घेतलेला निर्णय अतिशय योग्य असून कौशल्य विभाग याची पहिल्यांदा अंमलबजावणी करत असल्याचा आनंद असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.



क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती निमित्त कौशल्य विभागाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यभरातील आदिवासी आणि दुर्गम भागात नियम शिथिल करून ३०० चौरस फूट जागेत महात्मा जोतिबा फुले कौशल्य विकास केंद्र, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग शासनाने समाविष्ट केलेल्या भारतीय सल्लागार  कंपन्यांची सेवा घेणार आहे.

महात्मा जोतिबा फुले कौशल्य विकास केंद्र चालविण्यासाठी सल्लागारांच्या सेवा उपलब्ध करून देण्याचे काम सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, छत्रपती संभाजीनगर, सेंटर ऑफ पॉलिसी रिसर्च अँड गव्हर्नन्स, मुंबई, सेवा सहयोग फाऊंडेशन, पुणे आणि मुंबई येथील विवेक व्यासपीठ, मुंबई या सूचिबद्ध(एम्पॅनलमेंट) संस्थांना देण्यात यावे, अशी सूचना कौशल्य विभागाला या पत्रात करण्यात आली आहे. मंत्री लोढा यांनी सांगितले की,  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव भारताच्या संकल्पनेत स्वदेशीला विशेष महत्त्व दिले आहे. त्यामुळेच मेक इन इंडियामुळे भारतीय उद्योजकांचा आत्मविश्वास वाढला असून भारतीय दर्जेदार उत्पादने जगभरात लोकप्रिय होत आहेत. हाच स्वदेशीचा नारा आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात अमलात आणला आहे.  विदेशी सल्लागार कंपन्या ऐवजी आता प्रशासनाच्या सहकार्यासाठी भारतीय सृजनशील तरुण पुढे येणार आहेत. त्यांच्या बुद्धिमत्तेचा खऱ्या अर्थाने सन्मान होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाने भारतीय तरुणांच्या संशोधनात भारतीयत्वाची सांगड दिसून येणार असून स्वदेशी सल्लागार कंपन्या जगभरात भरारी घेण्यासाठी सज्ज होणार आहेत.

## दरवाजे बंद, तरी नॉन एसी; मुंबईकरांसाठी नवी लोकल सज्ज

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतीलच नाही तर भारतातील पहिली नॉन एसी बंद दरवाज्याची लोकल ट्रेन धावणार आहे. रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी हे महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे.

ही रेल्वे १२ कोचची आहे. या लोकलचा क्रमांक २६८२०१-२६८२१२ असा आहे. हा भारतीय रेल्वेतील एक खास प्रोटोटाईप आहे. गर्दीच्या वेळी प्रवाशांना अधिक लोकलची गरज आहे. लोकलवरील गर्दी कमी करण्यासाठी मेट्रो आणि पाण्यावरील टॅक्सीचाही प्रयोग करण्यात येत आहे. त्यासोबतच लोकलचा प्रवास सुरक्षित करण्यावर भर देण्यात येत आहे.

चेन्नई येथील इंटीग्रल कोच फॅक्ट्रीमध्ये (खउऋ) या ट्रेनचे खास डिझाईन तयार करण्यात आले आहे. ही एक वेस्टिब्युल ट्रेन आहे. त्यामध्ये सहा सहा डब्बे असतील. सहा डब्ब्यांचे दोन युनिट आहेत. एका डब्ब्यातून दुसऱ्या डब्ब्यात जाता येईल. महिलांसाठी आरक्षित डब्बे असतील. या रेल्वेत कोणताही फर्स्ट क्लास डब्बा नसेल. या बंद दरवाज्याच्या नॉन एसी रेल्वेमुळे





सुरक्षेचा प्रश्न मिटणार आहे. कुणालाही दरवाजात लटकता येणार नाही.

सर्वात मोठे आव्हान हे या डब्ब्यातील हवा येण्याविषयीचे आहे. पण चिंता करण्याची गरज नाही. या नॉन एसी डब्ब्यांच्या छतावर व्हेंटिलेशन युनिट्स लावण्यात आले आहे. छतावर ब्लोअर्स लावण्यात आले आहेत. त्यातून सातत्याने ताजी हवा येत राहील आणि प्रवाशांना दमटपणाचा त्रास होणार नाही. खेळती हवा असेल. विशेष म्हणजे पावसाळ्यात या ब्लोअर्सच्या डिझाईनमुळे पावसाचे पाणीही डब्ब्यात शिरणार नाही.

अत्यंत गर्दीच्या वेळी ही नॉन एसी बंद दरवाज्याची लोकल धावेल. या लोकलमध्ये ऑटोमॅटिक दरवाजे बंद करण्याची सिस्टिम आहे. यामध्ये सेन्सर, टॉकबॅक, प्रवाशांसाठी स्टेशनची माहिती देणारे डिस्प्ले बोर्ड असेल. तर डब्यात कार्बन डायऑक्साईड जमा होऊ नये यासाठी खास सुविधा आणि सोय करण्यात आली आहे. ही लोकल कधी धावणार याविषयीची मुंबईकरांमध्ये मोठी उत्सुकता आहे. पण त्यासाठी प्रवाशांना अजून काही महिने लागू शकतात. या लोकलच्या काही चाचण्या अद्याप बाकी आहे. त्यानंतर ही लोकल धावेल.

## मुंबईत उद्यापासून 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' ची अंतिम फेरी

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत 'माय युवा भारत'द्वारे 'माय भारत बजेट क्वेस्ट २०२६' मुंबई झोनच्या अंतिम फेरीची घोषणा करण्यात आली आहे. या झोनमध्ये महाराष्ट्र, गोवा आणि पुदुच्चेरीचा समावेश आहे. ही दोन दिवसीय अंतिम फेरी १२ व १३ एप्रिल २०२६ दरम्यान नवी मुंबईतील नेरूळ येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे होणार असल्याची माहिती माय युवा भारत महाराष्ट्र व गोवा चे राज्य संचालक अमित पुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी माय युवा भारत मुंबई चे उपसंचालक अनुप इंगोले उपस्थित होते.

अमित पुंडे यांनी सांगितले की, या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात देशभरातून राष्ट्रीय स्पर्धेतून निवड झालेले उत्कृष्ट युवा सहभागी एकत्र येणार आहेत. दोन दिवसीय विचारमंथन सत्रात शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विषयविशेषज्ज्ञ सहभागी होऊन केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ शी निगडित विषयांवर चर्चा करतील. देशभरातील १७ ठिकाणांहून १५,००० हून अधिक युवक या संवादात सहभागी होणार आहेत.

देशभरातून १२ लाखांहून अधिक युवकांनी सहभाग नोंदवला असून ४६,५०० पेक्षा अधिक निबंध प्राप्त झाले आहेत. मुंबईतील अंतिम फेरीत सहभागी युवक विकसित कृषी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शेतकरी कल्याण बळकटीकरण तसेच मानवी संसाधन शिक्षण, कौशल्य विकास आणि रोजगार या विषयांवर चर्चा पुढे नेतील. १२ एप्रिल रोजी सहभागींचे आगमन व नोंदणी होईल आणि दुपारी महिला युवा संसद आयोजित केली जाईल. १३ एप्रिल रोजी उद्घाटन समारंभ, माय भारत सत्र आणि दोन तज्ज्ञ पॅनल चर्चांचे




आयोजन करण्यात येणार आहे.

'नारी शक्तीः विकसित भारत की आवाज' या विषयावर आधारित महिला युवा संसद हा कार्यक्रमाचा विशेष भाग असेल. या सत्रात महिला सहभागी महिला आरक्षण विधेयकावर संसदीय पद्धतीने चर्चा करतील. पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १२ एप्रिलच्या सायंकाळी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या सहकार्याने 'संडे ऑन सायकल' हा उपक्रम नेरूळ येथील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम येथे आयोजित करण्यात येणार आहे. १३ एप्रिल २०२६ रोजी निवडलेल्या ९११ सहभागींचा केंद्रीय अर्थसंकल्पातील विविध क्षेत्रांवर सखोल संवाद होईल. राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांसह हा संवाद होणार आहे.

२ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. माय भारत बजेट क्वेस्ट २०२६ हा उपक्रम केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ आणि युवकांच्या आकांक्षा यांना जोडणारा एक परिवर्तनशील मंच ठरला आहे. विशेषतः विकसित भारत युवा लीडर्स डायलॉगमधून आलेल्या अनेक कल्पनांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात आला असून, यामुळे धोरणनिर्मितीत युवांना केंद्रस्थानी ठेवण्याच्या सरकारच्या बांधिलकीला अधोरेखित केले आहे, असेही श्री. पुंडे यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले सूरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या पार्थिवाचे दर्शन



**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित सूरसम्राज्ञी आशा भोसले यांचे आज मुंबईतील बीच कँडी रुग्णालय येथे निधन झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याच्या राहत्या घरी जाऊन त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, आमदार सुनील शिंदे, आमदार प्रसाद लाड यांनीही श्रद्धांजली अर्पण केली.

सूरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या पार्थिवावर उद्या, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ४ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, अशी माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली.

# हस्तलिखितांचा ठेवा जपा; माहिती शासनाला कळवा - सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या ज्ञानभारतम् या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ झाला असून या मोहिमेला आता वेग येत आहे. नागरिक, संस्था किंवा खाजगी संग्राहककांकडे हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्यांनी त्याची माहिती ज्ञानभारतम या पद्वारे शासनाला कळवून या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले आहे.

भारताला हस्तलिखितांचा समृद्ध वारसा लाभलेला असून पारंपरिक ज्ञानाची परंपरा या हस्तलिखितांतून पिढ्यान् पिढ्या जपली गेली आहे. मात्र, ही मौल्यवान हस्तलिखिते देशभर विखुरलेल्या स्वरूपात असल्याने त्यांचे शास्त्रीय दस्तऐवजीकरण आणि संवर्धन करणे गरजेचे झाले आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने ज्ञानभारतम् प्रकल्पाची आखणी केली असून या माध्यमातून हस्तलिखितांचे सर्वेक्षण, नोंदणी, संवर्धन, डिजिटायझेशन आणि प्रसार करण्यावर भर दिला जात आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच या हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधितांकडेच कायम राहणार असून इच्छुकांनी स्वेच्छेने शासनाकडे सुपूर्द केल्यास ती स्वीकारली जाणार आहेत. सर्वेक्षणाकरिता ज्ञानभारतम (ॠूपलहरीरा)हे प विकसित करण्यात आले असून हे प वापरण्यास अत्यंत सोपे आहे. या पवर आपल्याकडील हस्तलिखितांची माहिती अपलोड करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाची महत्त्वपूर्ण भूमिका असून महाराष्ट्रात विविध विद्यापीठे, संशोधन संस्था, सांस्कृतिक संस्था आणि विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येत आहे. कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे ही क्लस्टर केंद्रे म्हणून कार्यरत असून आनंद आश्रम संस्थान, पुणे तसेच भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे ही स्वतंत्र केंद्रे म्हणून काम पाहणार आहेत.

महाराष्ट्रासाठी पुराभिलेख संचालनालय, मुंबई ही राज्य नोडल संस्था म्हणून कार्यरत असून राज्य नोडल अधिकारी म्हणून संचालक श्री. सुजितकुमार उगले काम पाहत आहेत. तसेच श्रीमती अंजली ढमाळ या सहनोडल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ही मोहिम सांस्कृतिक कार्य विभाग, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, दक्षिण-मध्य सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार, राष्ट्रीय अधुनिक कला केंद्र, सर्व जिल्हाधिकारी यांच्या सहाय्याने राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय यंत्रणा सक्रिय करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था आणि खाजगी संग्राहक यांना या सर्वेक्षणात सहभागी करून घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. तसेच या राष्ट्रीय मोहिमेत शैक्षणिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, स्वयंसेवी संस्था, तसेच छउउ, छडड स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात

### अधिक सुरक्षित, पारदर्शक शालेय वाहतुकीसाठी राज्य शासन कटिबद्ध - मंत्री सरनाईक

**मुंबई । प्रतिनिधी**



शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कठोर आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६' लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्व सामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला योग्य प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाईल. विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी ती कमिटी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सर्व शालेय बस व व्हॅनमध्ये ॠझड-आधारित तशहळलश्रश डेलरींळेप ढीरलज्ञळपस ऊशींळलश व पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अग्निसुरक्षा यंत्रणा, उउढत प्रणाली, तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्टची सक्ती केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषतः पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता ५ वीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे. बस चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल. नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील.

या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

# जळगावात घधउच्या बहाण्याने महिलांकडे शरीरसुखाची मागणी

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगावात केवायसीच्या बहाण्याने महिलेकडे शरीरसुखाची मागणी करण्यासह अन्य एका महिलेकडे प्रेमसंबंधाची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी ३८ वर्षीय गोकुळ रमेश चव्हाण याच्याविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात महिलांच्या विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.लाडकी बहीण योजनेचे केवायसी करायचे असल्याने चव्हाण महिलेच्या घरी आला व कागदपत्रे घेत शरीरसुखाची (गरश्रसरेप उीळाश छश्रुी) मागणी केली. अन्य एका महिलेला निवृत्ती वेतन पुन्हा सुरू करून देतो, असे म्हणत चव्हाण याने प्रेमसंबंधाची मागणी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर गोकुळ चव्हाण फरार असून त्याचा पोलीस शोध घेत आहे.

गोकुळ चव्हाण हा सामाजिक कार्यकर्ता असून त्याचे जळगाव शहरात ऑनलाइन सेतू सुविधा केंद्र असल्याची पोलिसांची माहिती आहे. याप्रकरणात रोहिणी खडसे यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका करत आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेबाबत जळगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सागर शिंपी यांनी माहिती देताना सांगितलं की, दोन महिलांच्या तक्रारी आल्या आहेत. जळगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गेंदालाल मिल परिसरातील दोन पीडित महिलांनी गोकुळ चव्हाण याच्याविरुद्ध तक्रार दिली आहे.

पहिल्या पीडितेच्या तक्रारीमध्ये, 'पीडित महिलेच्या पतीने आरोपी गोकुळ चव्हाण याला घरचे कागदपत्रे आणि ई-केवायसी (श-घधउ) अपडेट करण्यासाठी घरी बोलावले होते. आरोपी हा पीडितेच्या पतीचा मित्र असल्याने त्याचे घरी येणे-जाणे होते. या संधीचा फायदा घेत त्याने पीडित महिलेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला आणि तिला अश्लील मागणी केली. पीडितेने या प्रकाराबाबत पतीला सांगणार असल्याचे म्हटल्यावरही त्याने तिचा पाठलाग करणे आणि त्रास देणे सुरूच ठेवले होते.

दुसऱ्या पीडितेच्या तक्रारीमध्ये, आरोपीविरुद्ध पहिली तक्रार दाखल होत असल्याचे समजताच दुसऱ्या एका पीडित महिलेनेही पोलिसांकडे धाव घेतली. या महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपीने एका शासकीय योजनेच्या कामासाठी तिचा मोबाईल क्रमांक मागितला होता. त्यानंतर त्याने तिच्याकडे प्रेमसंबंधाची मागणी करत वारंवार त्रास दिला.

तर आरोपीचे पूर्ण नाव गोकुळ रमेश चव्हाण असून तो गेंदालाल मिल परिसरातीलच रहिवासी आहे. तो स्वतःला 'सामाजिक कार्यकर्ता' म्हणून घेतो आणि 'सीएससी' (उडउ) केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्याचे काम करतो.




पोलिसांनी दोन्ही महिलांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध विनयभंग आणि पाठलाग करणे या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. आरोपीने अशाच प्रकारे आणखी काही महिलांची अडवणूक केली आहे का, याचीही चाचपणी केली जात आहे, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

लाडकी बहिण योजनेच्या ए-घधउ साठी महिलांकडे शरीरसुखाची मागणी केल्याच्या घटनेवरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. स्वतःची पाठ थोपटून घेण्यातून आपल्याला वेळ मिळाला असेल तर आपले याकडे लक्ष आहे का ? असा सवाल त्यांनी थेट मंत्र्यांना केला आहे. रोहिणी खडसे आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या की, आमच्याजळगावमध्ये लाडकी बहीण योजनेची ए-घधउ करण्यासाठी महिलांकडे शरीरसुखाची मागणी करण्याचे दोन धक्कादायक प्रकरण घडले आहेत. मंत्री महोदय आदिती तटकरे, स्वतःची पाठ थोपटून घेण्यातून आपल्याला वेळ मिळाला असेल तर आपले याकडे लक्ष आहे का ?

एकनाथ शिंदेभाई, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने 'लाडकी बहिण योजना' आणली. तेव्हा मतांसाठी सरसकट महिलांना या योजनेचे पैसे देण्यात आले. आता मतदान मिळाल्यानंतर मात्र योजनेसाठी विविध अटी, शर्ती लावल्या जात आहे. ही ए-घधउ करत असताना महिलांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कुठे बँक खात्याची अडचण येत आहे, कुठे मोबाईल नंबरची, काही महिलांचे तर सर्व कागदपत्रांची जुळणी झाली असताना त्यांना या योजनेतून बाद केले जात आहे. यामुळे महिलांची प्रचंड धावपळ होत आहे. यात काही राक्षसी वृत्तीचे लोक डाव साधतात. यात तात्काळ लक्ष घालून लवकरात लवकर योग्य कारवाई करा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांचे निधन; उद्या सकाळी अंत्यदर्शन दादर

**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ पार्श्वगायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांचे आज मुंबईच्या ब्रिज कँडी रुग्णालय येथे दुःखद निधन झाले आहे.

त्यांच्या पार्थिवाचे उद्या, दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत कासा ग्रँडे को-ऑप. हाऊसिंग सोसायटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. यावेळी मान्यवरांना अंतिम दर्शन घेता येणार आहे.

त्यानंतर दुपारी ४.०० वाजता कै. भागोजी कीर हिंदू स्मशानभूमी, प. पू. जांभेकर महाराज पथ, शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## अपघात भरपाईसाठी टोकाचे पाऊल; युवकाचे अपहरण करून खंडणीची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर एका २० वर्षीय चालकाचे अपहरण करून त्याला डांबून ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी युवकाच्या कुटुंबीयांकडे १ लाख २५ हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केली होती. याप्रकरणी पोलिसांनी मुंबईतील चार आरोपींना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि त्याच्या साथीदारांच्या गाडीचा सावर्डे बाजारपेठ येथे अपघात झाला होता. या अपघातातील नुकसान भरपाई मिळवण्यासाठी आरोपींनी टोकाचे पाऊल उचलले. त्यांनी चालक सिद्धेश मारुती शिंगरे (वय २०) याला जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेऊन त्याचे अपहरण केले. तक्रारदार मेघा मारुती शिंगरे (वय ४५, रा. बिडलिंगनगर, कणकवली) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी सिद्धेशला डांबून ठेवत त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. आरोपींनी वेळोवेळी नातेवाईकांकडून १८ हजार आणि २५ हजार रुपये उकळले. मात्र, एवढ्यावरच न थांबता त्यांनी उर्वरित १ लाख २५ हजार रुपयांची मागणी केली. पैसे दिले नाहीत, तर मुलाला ठार मारू, अशी धमकीही आरोपींनी दिली होती.



या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि चार आरोपींना अटक केली. तेजस गायकवाड, शुभम गायकवाड, राजू गायकवाड, विनोद टक्के (सर्व रा.मुंबई) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या सर्वांवर अपहरण, मारहाण आणि खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महामार्गावर अशा प्रकारे तरुणाचे अपहरण करून खंडणी मागितल्याच्या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण आहे. अपघातासारख्या कारणावरून थेट अपहरण आणि जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या या आरोपींच्या कृत्यामुळे पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

## गारे पालमा कोळसा खाण प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा - देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**



राज्यातील ऊर्जा सुरक्षितेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उच्च दर्जाच्या कोळसा खाणीमुळे कोळशाचे अवलंबित्व कमी होणार आहे. तसेच पर्यावरणाच्या संवर्धनासोबत विजेचे दर कमी होऊन भविष्यातील ऊर्जा गरज पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

महानिर्मितीच्या छत्तीसगड राज्यातील गारे पालमा सेक्टर -२ कोळसा खाणीतून कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात येणाऱ्या पहिल्या कोळसा रेल्वेरॅक चे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी रेल्वेरॅकला हिरवी झेंडी दाखवून कोळसा हातळणी प्रकल्पाची पहाणी केली. त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष राधाकृष्णन बी, संचालक अभय हरणे, कार्यकारी संचालक नितीन वाघ, गारे पालमा कोळसा खाणीचे मुख्य अभियंता शैलेश पडोळे, कोराडी औष्णीक प्रकल्पाचे मुख्य अभियंता सुदीप राणे, कार्यकारी संचालक पंकज सपाटे, गिरीश कुमार, मध्य रेल्वेचे विभागीय महाव्यवस्थापक दीपककुमार गुप्ता, विनायक गर्गा, आदी पदधकारी व अधिकारी उपस्थित होते.

गारे पालमा या कोळसा खाणीतून अत्यंत उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होत असल्यामुळे ऊर्जा निर्मितीची क्षमता वाढणार असल्याचे सांगतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की ऊर्जा निर्मितीसाठी असलेले अवलंबित्व त्यामुळे कमी होणार आहे. तसेच पर्यावरणा सोबत विजेचे दर कमी होण्यास मदत होणार आहे. राज्यातील लोडशेडींग राहणार नाही तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करणे सुलभ होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महानिर्मितीला गारे पालमा ही कोळसा खाण आवंटीत झाली असून १ हजार ५८३.४८७ हेक्टर मध्ये असलेल्या खाणीमुळे पुढील ७७ वर्ष उच्च दर्जाचा कोळसा उपलब्ध होणार आहे. या खाणीत ६५५.१५२ मेट्रिक टन कोळसा उत्पादन होणार आहे. या खाणीत मार्च २६ पासून उत्पादन सुरू झाले असून आतापर्यंत ८० हजार ८९५.३१ मेट्रिक टन कोळशाचे उत्पादन झाले असल्याची माहिती यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

या कोळसा खाणीमधून कोराडी, चंद्रपूर आणि परळी येथे दीर्घकालीन पुरवठा होणार आहे. महाऊर्जाला उपलब्ध झालेल्या या खाणीमुळे कोळशाच्या गुणवत्तेवर नियंत्रण राहणार आहे. हा प्रकल्प राज्याच्या ऊर्जा सुरक्षेला बळकटी देणारा असून भविष्यातील वीज तुटवड्याचा धोका कमी होणार आहे. तसेच दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. प्रारंभी महानिर्मितीचे अध्यक्ष राधाकृष्णन बी यांनी स्वागत करुन या प्रकल्पाबद्दल माहिती दिली. यावेळी लोकप्रतिनिधी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू : मदत आणि उपचाराला मिळणार गती

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे




रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

# पंढरपुरात हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; ५० लाखांच्या मागणीप्रकरणी प्रतिष्ठित कुटुंबावर गुन्हा दाखल

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यात हुंडाबंदी कायदा असतानाही आजही मुलीच्या वडिलांनीलग्नात मोठ्या रकमेसह दागदागिने आणि संसारपयोगी वस्तू भेट म्हणून नवऱ्या मुलाच्या कुटुंबीयांना द्याव्याच लागतात हे वास्तव आहे. मात्र, मुलीच्या वडिलांना सर्वकाही देऊनही पुन्हा सासरी गेल्यानंतर मुलीचा छळ केला जाता. देशाला अध्यात्म आणि भक्तीचा मार्ग दाखवणाऱ्या विठुरायाच्या पंढरपुरात हुंड्यासाठी मुलीचा छळ केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उद्योग-व्यवसायासाठी माहेरहून ५० लाख रूपये आणण्यासाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणीपंढरपुरातील प्रतिष्ठित राजकीय कुटुंबाविरोधात पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तसेच, पीडित महिलेनंही सासरच्या कुटुंबीयांकडून जीवे मारण्याची धमकी देण्यात येत असल्याची माहिती दिली.

पंढरपुरात विवाहित महिलेवर घटस्फोट साठी दबाव टाकण्यात येत असल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच, पीडित विवाहिता तिच्या कुटुंबाला ठार मारण्याची धमकी देत ५० लाख रुपये माहेरहून आणण्यासाठी शिंदे नाईक कुटुंबाने छळ केल्याचा आरोप आहे. सोलापूरमधील ऐश्वर्या श्रीमान हिचा विवाह २०१७ मध्ये पंढरपूर मधील रोहन शिंदे नाईक सोबत झाला. शिंदे नाईक कुटुंबाने विविध व्यवसाय करण्यासाठी ऐश्वर्या हिला माहेरहून ५० लाख रुपये आणण्यासाठी वारंवार शारीरिक मानसिक छळ केला. तिने रक्कम न आणल्याने तिला मूल होऊ दिले नाही, मूल झाले तर संपत्तीत वारस होईल, असेही संबंधित कुटुंबीय म्हणायचे.



विशेष म्हणजे, सासरच्या छळाला कंटाळून ऐश्वर्या माहेरी गेल्यानंतर रोहनने बारामतीमधील एका मुलीशी विवाह केला. घटस्फोट न होताच सदर विवाह केला असून रोहनचा नगरसेवक भाऊ राहुल यांच्यासह कुटुंबाने माहेरी येऊन जीवे मारण्याची धमकी दिली. यापूर्वी, आम्ही एका कुटुंबाला असंच संपवलं असून तुम्हालाही संपवू अशी धमकी दिल्याचा आरोप पीडित विवाहिता ऐश्वर्याने केला आहे.

वडिलांनी लग्नात २५ तोळं सोनं, अडीच किलो चांदी आणि २ लाख रुपये कपडे, व्हिडिओ शुटींगसाठी दिले होते. लग्नानंतर ८-९ महिने माझा संसार नीट सुरू होता. मात्र, नंतर, त्यांच्या विविध उद्योगासाठी, पेट्रोल पंपासाठी, रोड काँट्रॅक्टसाठी ५० लाख रुपये माहेरहून आणण्याचा तगादा लावला.

तसेच, पैसे न आणल्यास मूल न होऊ देण्याचा दबाव आणला. दरम्यान, पंढरपूर शहर पोलिसात पीडित विवाहितेचा पती, दीर नगरसेवक राहुल सह १२ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. अद्याप राजकीय दबावापोटी कोणालाही अटक झाली नाही, असेही पीडिताने म्हटले. तसेच, आम्हाला न्याया द्यावा, अशी मागणीही तिने केली आहे.

## संक्षिप्त

### जयाद्री मल्हारसागर धरणात ३६ टक्के पाणीसाठा ४३ गावाना पिण्यासाठी पुरेसा.

**पुरंदर । प्रतिनिधी**

जलव्यवस्थापना करिता सदैव उदासीन ठरलेल्या दुष्काळी पुरंदर तालुक्यातील कऱ्हा नदीच्या मल्हारसागर धरणात यंदा निसर्गता सदैवाने यंदा ३६टक्के आणि ४३गावांना पुरेसा पाणी साठा उपलब्ध आहे.सदैव दुष्काळी असणाऱ्या पुरंदर तालुक्याला वरदान ठरलेल्याकऱ्हा नदीवरील मल्हारसागर धरणात ३६ टक्के पाणीसाठा उपलब्ध असून या धरणावर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून असणाऱ्या ४३ गावांना पिण्याच्या पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे.निसर्गता मिळालेले पाणी आता उपयुत ठरत आहे परंतु उन्हाळ्याच्या मागिल काळात पाणी टँचाई तीव्र जाणवत होती. कायमस्वरूपी हा प्रश्न सोडविण्यासाठी वीर चे पाणी मल्हारसागरात आले पाहिजे अशी मागणी सर्वत्र होतं आहे. पुरंदर तालुक्यातील मल्हारसागर धरणाची पाणीसाठा क्षमता ही पाऊण टीएमसी असून गतवर्षी चांगला पाऊस झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरून चांगला पाणीसाठा निर्माण झाला होता. या धरणावर जेजुरी,जेजुरी औद्योगिक वसाहत,बारामती तालुक्यातील मोरगाव व सोळा गावे,माळशिरस पारगाव योजना,पांडेश्वर मावडी योजना यातून ४३ गावांना पिण्याचे पाणी दिले जाते. तर सुमारे एक हजार हेक्टर शेती हंगामी स्वरूपात ओलीता खाली येते.

मल्हारसागर धरणाची पाणी साठवणूक क्षमता ७८८ दशलक्ष घनफूट असून मृतसाठा २०० दशलक्ष घनफूट आहे. मागील वर्षी समाधान कारक पाऊस झाल्याने आज पर्यंत धरणात ४२५ दशलक्ष घनफूट पाणी साठा शिल्लक आहे.मृतसाठा वगळता सुमारे ३६ टक्के पिण्यासाठी पाणी साठा उपलब्ध आहे. हे पाणी ऑगस्ट अखेर पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे अशी माहिती नाझरे पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता गणेश गायकवाड यांनी दिली. पुरंदर तालुक्याचे सरासरी पर्जन्यमान ४९६ मिलिमीटर असून गतवर्षी सरासरी पेक्षा दुप्पट पाऊसाची नोंद झाली होती. जेजुरी एम आय डी सी,जेजुरी शहर,मोरगाव व १६ गावे,नाझरे व पाच गावे तसेच कोळविहिरे योजनेला पिण्याचे पाणी तसेच सुमारे शेत जमिनीला हंगामी स्वरूपात पाणी दिले जाते. नाझरे धरणात पुरेसा पाणी साठा उपलब्ध असल्याने उन्हाळी पिकांसाठी आवर्तन देण्यात येत आहे. कालवा व उपसा सिंचन द्वारे २०० हेक्टर शेती त्यामुळे ओलिता खाली येत आहे. यावर्षी मल्हारसागर धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असल्याने सुमारे ४३ गावांची तहान भागणार आहे.

### प्रभाग ६ मध्ये ‘एसआयआर’ कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**परतूर । प्रतिनिधी**

शहरातील सन्मित्र कॉलनीतील प्रभाग क्रमांक ६ मध्ये मतदार यादी पुनर्निरीक्षणासाठी एसआयआर कॅम्पचे आयोजन करण्यात आले. गटनेते नगरसेवक प्रकाशराव चव्हाण यांच्या पुढाकारातून पार पडलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ भाजपा नेते भगवानराव मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी शाहाजी राक्षे, दवणे, ईक्कर महाराज, श्री मुळे , चंदेल , पाठोळे, बाळू आडे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कॅम्पमध्ये २००२ च्या मतदार यादीची पडताळणी करून नागरिकांची नावे निश्चित करण्यात आली. तसेच ज्या नागरिकांची नावे वगळली गेली होती किंवा नवीन नोंदणी करायची होती, त्यांचे अर्ज भरून घेण्यात आले. निवडणूक ओळखपत्राशी आधार लिंक करणे, पत्ता बदल आदी बाबींवरही मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे हा त्यांचा हक्क आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, यासाठी हा उपक्रम राबवला, असे प्रकाशराव चव्हाण यांनी सांगितले. कॅम्पमध्ये ज्येष्ठ नागरिक, महिला व तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नायब तहसीलदार कुलकर्णी, पालिकेचे श्री.सावंत, शिवदास चव्हाण ,बीएलओ कैलास गाडगे ,प्रमोद राठोड अमोल पैठणकर श्रीपाद तरासे, संतोष हीवाळे, अर्जुन राठोड, राहुल गनकवार, दिपक मोरे, सुनिल खरात, काळे आदी जणांची उपस्थिती होती.

# महिलांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली

## सामाजिक कार्यकर्त्या मनिषा तोकले यांचे जालन्यात प्रतिपादन

**जालना । प्रतिनिधी**

महिलांना पुरुषप्रधान संस्कृतीत अन्यायाविरुद्ध लढण्याची व स्वतःच्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानातून दिली असून त्यांच्या क्रांतिकारी योगदानामुळे आज महिला स्वाभिमानाने व सन्मानाने जीवन जगत असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या तथा जागर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मनिषा तोकले यांनी येथे केले. जालना शहरातील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या मैदानावर सुरू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफतांना त्या बोलत होत्या.

महापौर वंदना मगरे अध्यक्षस्थानी होत्या. सामाजिक कार्यकर्त्या वैशाली सरदार, नूतन मघाडे,कुसूम रगडे,रंजना धामोने आदींची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. विचारमंचावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे अध्यक्ष डॉ. शांताराम रायपुरे, सचिव सुधाकर रतनराव रत्नपारखे यांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांसाठी योगदान' या विषयावर विचार मांडताना तोकले पुढे म्हणाल्या की,हजारो वर्षे भारतीय महिला ह्या सामाजिक गुलामगिरीत जीवन जगत होत्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे भारतीय स्त्री जातीची उन्नती झाली. त्यामुळे परिवर्तनवादी चळवळीत महिलांचे मोठे योगदान आज दिसून येते.महिलांचा सन्मान व्हावा, ही बाब विचारात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांना शिक्षण, मालमत्तेत समान हक्क आणि नोकरीचे अधिकार देऊन ' चूल आणि मूल' या बेड्या तोडल्या. त्यांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना सन्मान मिळवून दिला. जगातील प्रगल्भ लोकशाहीचा डंका वाजविणाऱ्या देशात आजही महिला राष्ट्रपती होऊ शकत नाही.ते संविधानामुळे आपल्या देशात झाले.देशाच्या प्रतिष्ठित पदावर महिलांना स्थान मिळाले.बाबासाहेबांनी महात्मा फुले यांना गुरू मानले होते, महात्मा फुले यांनी महिलांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या शिक्षणावर भर दिला. भारतीय संविधानाच्या कलम १४ ते १८ अंतर्गत महिलांना पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात समानता दिली. हिंदू कोड बिल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांसाठी मोठे योगदान मानले जाते. महिलांना




अन्यायाविरुद्ध लढण्याची व स्वतः च्या पायावर उभे राहण्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच दिली. आज भारतीय महिलांना स्वाभिमानाने व सन्मानाने जीवन जगत आहेत, त्यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दूरदृष्टीकोन होता. डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी योगदानामुळेच स्त्री- पुरुष समानतेचे महत्त्वही तोकले यांनी यावेळी अधोरेखित केले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला गुलाम बनविणाऱ्या रूढी परंपरा तोडून त्यांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला. आजही समाजात महिलांना आपल्या न्याय हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो आहे, रूढी परंपरेने वागावे लागत आहे, जातीचा कट्टरपणा कायम असल्याची खंतही मनिषा तोकले यांनी यावेळी व्यक्त करून महिलांनी महात्मा फुले-सावित्रीबाई फुले- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महिलाविषयक कार्याचे स्मरण करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना वैशाली सरदार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आज महिला स्वाभिमानाने व सन्मानाने जगत असल्याचे सांगून या महामानवाच्या उपकराची महिलांनी जाणीव ठेवावी, असे आवाहन केले. नुतन मघाडे यांनी महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार दिला, सन्मान दिला, याच महापुरुषांनी महिलांना नवी दिशा दिली असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना महापौर वंदना मगरे म्हणाल्या की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच महिलांना सर्वच क्षेत्रांत समान संधी व सन्मान मिळाला आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळेच माझ्या सारखी सर्व सामान्य महिला जालना शहराची महापौर झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांवर थोर उपकार असल्याचे त्यांनी सांगितले. या व्याख्यानमालेच्या चौथ्या पुष्पाचे सूत्रसंचालन कांचन थोरवे यांनी केले तर आभार प्रदर्शन नंदिनी मोगरकर हिने केले.

## श्री हनुमान चालीसा केंद्र बनतील, हिंदू परिवारासाठी सुरक्षा, समृद्धी, सन्मान, स्वास्थ्य सेवा केंद्र

**टेंभुर्णी । प्रतिनिधी**

देशातील प्रत्येक गावात, प्रत्येक खेड्यात, शहरातील प्रत्येक वार्डात, कॉलनीत श्री हनुमान चालीसा केंद्र उभे राहतील व प्रत्येक हिंदु कुटुंबासाठी ही केंद्रे सुरक्षा, समृद्धी, सन्मान, मोफत स्वास्थ्य सेवा केंद्र बनतील असा आशावाद आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे डॉ प्रवीणभाई तोगडिया यांनी व्यक्त केला.

विहिंप व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या शिबीरामध्ये मार्गदर्शन करताना ते बोलत होते. जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी येथील श्रीदत्त मंदिराच्या सभागृहात ह्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या संबोधनात डॉ यांनी पुढे बोलताना सांगितले की, हिंदू समाज, हिंदू धर्म, हिंदू राष्ट्र हे अत्यंत दिव्य व प्राचीन असून जगातील सर्वात सुंदर व पुरातन संस्कृती आहे. प्रत्येक हिंदु कुटूंबातील एकूण एक सदस्यांनी दररोज सकाळी उठल्यावर हिंदू संस्कृतीतील परंपरेनुसार धरती मातेला, कुलदेवता-कुलदेवीस तसेच माता-पिता व घरातील ज्येष्ठ सदस्य यांचे चरण स्पर्श करून आशीर्वाद घ्यावा.

दररोज तुळशीला पाणी घालून नित्य नेमाने पुजा करावी, चिमणी-पाखरांना दाना-पाणी, गो-मातेला ताजं अन्न, दररोज जवळच्या मंदिरात दर्शनासाठी जाणे, सायंकाळी घरात धूप-दीप अशा प्रकारची दिनचर्या ठेवावी जेणेकरून धर्माचा व संस्कृतीचे जतन केले जाईल. श्री हनुमान चालीसा केंद्राच्या माध्यमातून गोरगरिबांना अन्नधान्य वाटप, मोफत खाजगी डॉक्टरकडून वैद्यकीय सेवा, त्याचबरोबर वकिलांकडून कायदेविषयक सेवा व हिंदू साठी रोजगार निर्मिती साठी सहाय्य, महिला सुरक्षा व सक्षमीकरण अशा विविध सेवा उपलब्ध करून देणारी व्यवस्था उभी करण्याचा मनोदय व्यक्त केला. अशारीतीने हनुमान चालीसाच्या सामूहिक पठणाने हिंदू समाज एकजुटीने भविष्यात येणाऱ्या अनेक समस्यांना समर्थपणे सामोरा जाईल व हे एकप्रकारे दर शुक्रवारी केल्या जाणाऱ्या नमाजपठणाचे प्रत्युत्तर ठरेल असा आत्मविश्वास बोलून दाखविला.

यानिमित्ताने डॉ तोगडिया यांचे शहरात मुक्कामाचे वास्तव्य होते. चोख बंदोबस्तासाठी जणू काही शहराला पोलीस छावणीचे रूप प्राप्त झाले होते. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या शिबीरामध्ये कोणतेही वेळेचा, तसेच सूत्रबद्ध नियोजनाचा अभाव वारंवार प्रकर्षाने जाणवत होता.

## नागाव बीचवर ‘रोबो रक्षक’ची तैनाती ; सरपंच हर्षदा मयेकर यांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय, पर्यटक सुरक्षित

**अलिबाग । प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांच्या पुढाकाराने अत्याधुनिक ‘रोबो रक्षक’ तैनात करण्यात आला आहे. बुडणाऱ्यांच्या तात्काळ बचावासाठी रिमोट कंट्रोलद्वारे चालणारी ही रोबोटिक वॉटर रेस्क्यू यंत्रणा छ्ळ्ठ्ऋ आणि नेव्ही मानकांनुसार चाचण्या पार पाडून तयार झाली असून, आता चौपाट्यांवर रोबोटची सतत नजर राहणार आहे.



रायगड कलेक्टर कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने आयोजित विशेष कार्यशाळेत नागाव ग्रामपंचायत एकमेव सहभागी झाली. सरपंच हर्षदा मयेकर यांच्यासह कल्पेश नायक, मनीश म्हात्रे, आशीष मानकर, विनेश नागवेकर या कर्मचाऱ्यांनी पूर्ण प्रशिक्षण घेतले, ज्यात पूर, समुद्रात वाहून जाणे, सर्पदंश, फर्स्ट एड आणि आपत्कालीन किटचा वापर यांचा समावेश होता. श्री. पाठक सरांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात पोलीस स्टेशनचे अधिकारीही सहभागी झाले.

कार्यशाळेत सरपंच हर्षदा मयेकर यांनी तीन रोबोटिक क्राफ्टबाबत समाधान व्यक्त करत आणखी १५ ची मागणी केली. तसेच, पारंपरिक लाइफगार्ड्सच्या मानधनासाठी कलेक्टर कार्यालयाकडून काही हिस्सा उचलावा अशी मांडणी करून पर्यटक सुरक्षेला प्राधान्य दिले.

नागाव ग्रामपंचायतीला हे क्राफ्ट उपलब्ध झाले असून, सरपंच स्वतः कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन प्रात्यक्षिक सादर केले.

हा पुढाकार नागावला पर्यटकांचे हब बनवणार असून, सरपंच हर्षदा निखिल मयेकर यांचा उद्देश भारताबाहेरील पर्यटक आकर्षित करणे आणि स्थानिकांना भरपूर रोजगार देणे हा आहे. वॉटर कारसारख्या उपक्रमांसह (फेब्रुवारी २०२६) रोबो रक्षकामुळे किनारा हायटेक होईल, ज्यामुळे ग्रामपंचायतीचे आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक होईल आणि पर्यटन वाढून आर्थिक समृद्धी येईल.

रोबो रक्षक २०० किलो वजन सहन करून १८ किमी/तास वेगाने बुडणाऱ्यांपर्यंत पोहोचून किनाऱ्यावर आणणार असून, मानवी जीवितहानी टाळेल. नागाव किनारा आता तंत्रज्ञानाने सक्षम झाला असून, पर्यटकांसह स्थानिकांच्या भविष्याला उज्ज्वल करणारा हा टप्पा ठरेल.

## हॉटेल गॅलेक्सीमध्ये ‘श्वास अखेरचा’चा भव्य प्रीमियर



**जालना । प्रतिनिधी**

श्वास अखेरचा या लघु चित्रपटाचा भव्य प्रीमियर शो उत्साहात पार पडला. हॉटेल गॅलेक्सी येथे आयोजित या कार्यक्रमाला सर्व कलाकार, मान्यवर व प्रेक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात कलाकार व उपस्थितांच्या साक्षीने करण्यात आली असून, संपूर्ण वातावरणात चित्रपटाबद्दल उत्सुकता आणि आनंदाची लहर पाहायला मिळाली.

या प्रीमियर सोहळ्यात चित्रपटातील कलाकारांनी आपले अनुभव व्यक्त केले, तसेच प्रेक्षकांनीही चित्रपटाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमादरम्यान चित्रपटाच्या निर्मितीमागील मेहनत आणि टीमचे योगदान विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. दरम्यान, श्वास अखेरचा हा लघु चित्रपट डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे औचित्य साधून १४ एप्रिल रोजी अधिकृतरीत्या रिलीज होणार आहे.

विशेष म्हणजे, हा लघु चित्रपट सत्य घटनेवर आधारित असून, श्री बालाजी किरवले यांच्या जीवन चरित्रावर आधारित आहे. तरी सर्व चित्रपटप्रेमींनी हा प्रेरणादायी लघु चित्रपट जास्तीत जास्त संख्येने पाहावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




# हंगामा नव्हे, शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार

**जालना । प्रतिनिधी**

जालना : शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ घोषणाबाजी नको, तर ठोस कृतीची गरज असल्याचे मत व्यक्त करत विविध नागरी प्रश्नांवर लक्ष वेधण्यात आले. सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नहीं, मेरी कोशिश है ये सूरत बदलनी चाहिए या भूमिकेतून शहरातील मूलभूत सुविधा, कामगारांचे हक्क आणि सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अनेक मुद्दे पुढे मांडण्यात आले.

मोतीबाग तलावाच्या मध्यभागी बुद्धाचे स्मारक उभारण्याचा प्रस्ताव मंजूर झाला असून यासाठी सुमारे साडेपाच एकर जागा उपलब्ध झाल्याचे सांगण्यात आले. या प्रकल्पात विपश्यना केंद्रासह इतर उपक्रम राबवता येणार असून, या कामाचे श्रेय माजी आमदार कैलास गोरंट्याल यांना देण्यात आले. या स्मारकामुळे शहराच्या सांस्कृतिक आणि पर्यटन विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.



शहरातील स्वच्छता व्यवस्थेवरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले. स्वच्छतेचे टेंडर अनुभवी आणि प्रतिष्ठित कंपनीलाच देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. सध्या स्वच्छता कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे सांगत, त्यांना किमान वेतन आयोगानुसार पगार देणे आवश्यक असल्यावर भर देण्यात आला. पुरुष कर्मचाऱ्यांना सुमारे आठ हजार रुपये वेतन बँकेमार्फत दिले जात असताना महिला कर्मचाऱ्यांना केवळ सहा हजार रुपये रोख देण्यात येत असल्याचा आरोप करत, यात स्पष्ट लिंगभेद होत असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच, स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण आणि आवश्यक सुरक्षा साहित्य देणे बंधनकारक करावे, अशी मागणी करण्यात आली. टेंडर प्रक्रियेत संबंधित कंपनीशी लेखी करार करून नियमांचे उल्लंघन झाल्यास टेंडर रद्द करण्याची तरतूद असावी, असेही सांगण्यात आले.

उघड्यावर होणारी मांसविक्री तात्काळ बंद करण्याची मागणी करत, अशा ठिकाणी पशुवैद्यकीय तपासणी न होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच, पाणीपुरवठा सुरू असताना वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी वॉटर सप्लाय विभागाने एमएसईबीसोबत समन्वय साधावा, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील रस्त्यांच्या मधोमध उभे असलेले विद्युत खांब अपघातांना कारणीभूत ठरत असल्याने ते तात्काळ हटवण्याची गरज व्यक्त करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी हे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, महात्मा फुले जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती या उत्सवांचे आयोजन महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात करून सामाजिक एकतेचा संदेश द्यावा, असे मत मांडण्यात आले.

शहरातील ११ वर्षांपेक्षा जुने असलेल्या वस्त्यांचा सर्वेक्षण करून त्यांना तात्काळ पीआर कार्ड देण्याची मागणीही करण्यात आली. तसेच, रेल्वे गेटजवळील पुलाखालील अतिक्रमणे हटवून त्या परिसराचे सुशोभीकरण करावे आणि तेथे लहान उद्यान उभारून त्याला महात्मा बसवेश्वर यांचे नाव द्यावे, अशी मागणी पुढे आली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक ज्योती मधुकर आडेकर यांनी डी.बी. कॉर्प लि. दिव्य मराठी, डी. १८१, शेंद्रा एम.आय.डी.सी. छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) - ४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून, कार्यालय दैनिक महिला संवाद, सी-२०३, अनंत पार्क, काळेवाडी रोड, राहटनी, धनगर बाबा मंदीराजवळ, पुणे शहर, पुणे - ४११०१७(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. संपादक : ज्योती मधुकर आडेकर, मो. नं. ९१६८५६७१११, कार्यकारी संपादक : विद्या जाधव, उप संपादक : सौ. सुनंदा राजु निक्रड,
मेल आयडी - mahilasanvad11@gmail.com, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - **MHMAR/25/A1224**

Printer, Publisher & Owner Jyoti Madhukar Adekar, Printed At D. B. Corp Ltd., Divya Marathi, D 181, SHENDRA MIIDC Chatrapati Sambhaji Nagar (AURANGABAD) - 431003(Maharashtra), And Published At Office Daily Mahila Sanvad C-203, Anant Park, Kalevadi Road, Rahatni, Near Dhangar Baba Mandir, Pune City, Pune -411017 (Maharashtra), Editor : Jyoti Madhukar Adekar, Mob. No. 9168567111, Executive Editor : Vidya Jadhav, Deputy Editor : Sau. Sunanda Raju Nikrad, E-Mail : mahilasanvad11@gmail.com **PRGI Reg. No. - MHMAR/25/A1224**